# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ०३/०६/२०२४

## दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| १ | फ्रेजरपुरा अप क्र. ५०५/२०२४ कलम ३२४,३२३,५०४,५०६ ३४,भादवी | सरदार चौक कुंभारवाडा अमरावती | दि.१/०६/२०२४ चे २१.०० वा. दाखल ता वेळ दि ०२/०६/२०२४ चे००.२६ वा. | सलमान करीम रायलीवाले वय ३० वर्ष रा फ्रेजरपुरा कुंभारवाडा | १)अयान इराम परसुवाले वय २५ वर्ष २) डब्बु उर्फ वसीम चौधरी दोन्ही रा कुंभारवाडा | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठीकाणी यातील फिर्य़ादीचे दोन्ही आरोपीसोबत पैशाचे व्यवहारावरून त्यांचेत भांडण झाले होते तेव्हा पोस्टे ला रिपोर्ट दिला होता घटनातावेऴी फिर्यादी हा दुध वाटप करणे करीता जात असता आरोपी क्र १ हा रस्तायत भेटला त्याने फिर्यादीला सोबत चलायला म्हटले तेव्हा फिर्यादीने आरोपीस सॉरी म्हटले तेव्हा तो फिर्यादीजवळ आला व शिवीगाऴ करून लागला फिर्यादीने त्यास समजाविण्याच प्रयत्न केलाअसता आरोपी क्र १ याने त्याचे जवळ असलेला चाकु काढला व फिर्यादीला मारला फिर्यादीने तो हुकविण्याच प्रयत्न केला असत तो चाकु त्याचे डावे बाजुने डोक्याजवऴ लागला तसेच आरोपी क्र २ हा सुध्दा तेथे आला व फिर्यादीला मारहाण केली व मारण्याची धमकी दिली अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |
| २ | पो.स्टे. नांदगाव पेठ अप.क्र. १९३/२४ कलम ३२४, ५०४, ३४ भादवि | संस्कृती मेडीकल बिल्डींग पोटे टाऊनशिप जवळ रोडवर ग्राम कठोरा बु. | दि.०१/०६/२०२४ चे ०१/४५ वा. दि.०२/०६/२४ चे १८/२५ वा. | जितेश सुधीर पाथरे वय ४३ वर्षे धंदा हॉटेल मॅनेजर रा. संस्कृती बिल्डींग रुम क्र. ७ पोटे टाऊनशिप जवळ अमरावती | १)सुरज कोवाळे वय २५ वर्षे रा. कठोरा रोडवर अमरावती २) दोन अनोळखी इसम | हकिकत अशा प्रकारे आहे कि,यातील फि.हा आयुश गुप्ता यांचे मालकीचे आरोमा होटेल मध्ये मॅनेजर म्हणुन काम करतो. हॉटेलमध्ये काम करणारा सुरज कोवाळे याने नशापाणी केले असल्याने फि.ने त्याची होटेल मालकाकडे तक्रार केल्यामुळे त्यास कामावरुन काढुन टाकले. फि. हा कामावरुन होटेल बंद करुन घरी जात असता नमुद घ.ता. वेळी व ठिकाणी सुरज कोवाळे व इतर दोन अनोळखी इसम तेथे आले व फि.ला काहीही न बोलता सुरज कोवाळे याने शिविगाळ केली व त्याच्या हातातील स्टीलचे रॉडने डोक्याला मारले.तसेच इतर अनोळखी इसमांनी सुध्दा काठीने मारहान केली.नंतर फि.ने मालकाला बोलावुन मालकाने पि.डि.एम.सी. दवाखाना अमरावती येथे भरती केले. डॉ. सा. यांनी फि. ला सुट्टी दिल्याने दि.०२/०६/२०२४ रोजी मालकासह पो.स्टे. ला रिपोर्ट देण्यास आलो. अशा फि. चे बयाण वरुन सदरचा गुन्हा दाखल. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | पो स्टे गाडगे नगर अमरावती अप क्र ५१५/२४ कलम ३२४,५०४,५०६,३४ भादवि | सिदधार्थ नगर अमरावती | दि.०२.०६.२४ चे १७.३० वा<br><br>दि.०२.०६.२४ चे २२.५९ वा | विजय गणपतराव खडसे वय २९ वर्ष रा राहुल नगर अमरावती | १. इशिनाथ गायकवाड<br>२.मनोहर यशंवतराव वानखडे<br>३. एक महीला<br><br>अमरावती | यावेळी नोंद आहे की ,यातील नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व त्याचा भाऊ सोबत भावाच्या पत्नीलाआनण्या करिता त्याचे सासुरवाडी येथे गेले असता भाऊ त्याचे पत्नीला तु घरी चल असे म्हटले असता आ क्र २ व ३ यांनी आम्ही तिला पाठवित नाही असे म्हणुन वाद केला.भाऊ त्याचे पत्नी सोबत बोलत असतांना फिर्यादी हे रोडवर उभा असतांना आरोपी क्र १ हा काठी घेवुन आला व त्याने तिन वेळा काठी फिर्यादीचे डोक्याल मारली त्यामुळे फिर्यादीचे डोक्याला जखम होवुन रक्त गेले.फि चा भाऊ समजाविण्यास आला असता आ क्र २ व ३ आले व माझ्या जावयाला व त्याचे भावाला मारा जास्त रंगबाजी करित आहे असे म्हणुन तिन्ही आरोपीनी फिर्यादी व त्याचे भावाला शिवीगाळ केली व मारण्याची धमकी दिली.अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा नोंद. |
| ४ | नागपुरी गेट अप नं २०७/२०२४ कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ भादवी | मुजफरपुरा पाण्याच्या बोरींग जवळ अमरावती | दि.०२.०६.२०२४ चे ११.३० वा<br><br>दि.०२.०६.२०२४ चे १९.२९ वा | अब्दुल एहसान अब्दुल कलाम वय ४२ वर्ष रा मुजफरपुरा अमरावती | १.अफरोज खान रहेमान खान<br>२.अब्दुल शाहिद<br>दोन्ही रा. मुजफरपुरा अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि, फिर्यादी फिर्यादीचा भाउ व दोन्ही आरोपी हे एकाच मोहल्यात राहतात फिर्यादी व आरोपी क्र १ सोबत बांधकामाच्या कामावर जातात फिर्यादीचे आरोपी क्र १ वर मजुरी व सेंट्रींग चे पैसे बाकी आहे नमुद घ ता वेळी व ठिकाणी फिर्यादीने आरोपीला कामाचे व सेन्ट्रींगचे पैसे मागितले असता आरोपीने म्हटले कि,मै तुझे पैसे भी नही देता और सेन्ट्रींग भी नही देता असे म्हणुन फिर्यादीस शिविगाळ केली व जोरात लोटले वरून फिर्यादीला हाताला व डोक्याला मार लागला भांडण सुरु असता फिर्यादीचा मोठा भाउ अब्दुल ईरफान अब्दुल कलाम हा भांडण सोडविण्याकरिता मधात आला असता आरोपी क्र १ ने फिर्यादीच्या भावाला बाजुच्या बोरींग जवळ पडले असलेले लाकडी रॅप्टर डोक्यावर मारले तेवढयात आरोपी क्र २ तेथे आला व त्याने फिर्यादीला म्हटले कि, तुम कितने है सब आओ सब चलते मुझे अशी धमकी दिली आणि शिविगाळ करून फिर्यादीच्या गालावर झापड मारली अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट,फिर्यादीचा भाउ अब्दुल ईरफान अब्दुल कलाम यांचे बयान व दोघांचेही मेडीकल सर्टिवरून सदरचा गुन्हा दाखल |

चोरी-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| १ | फ्रेजरपुरा अपक्र ५०७ /२४ कलम ३७९ भादवी | मालटेकडी रोडवर योगभवन समोर अमरावती | दि १.०६.२४ चे २२.०० वा ते दि ०२.०६.२४ चे ०८.०० वा<br><br>दि०२.०६.२०२४ चे १२.४३ वा | राजु भिमराव बोबडे वय ६० वर्षे ट्क मालक रा शामनगर गल्ली नं २ अमरावती | अज्ञात | हकीकत अशाप्रकारे आहेकी यातील फिर्यादी कडे बारा चक्का ट्रक आहे त्या ट्रकवर चालक देवराज मरकाम असुन तो ट्क चालवितो दि २८.०५.२०२४ ला रात्री १०.०० वा देवराज याने सदर ट्क योगभवन समोर मालटेकडीजवळ उभा करून ठेवला होता दि ०१.०६.२४ रोजी रात्री १०.०० वा फिर्यादी ट्क क्र एम एच ४० बी एल ५७८७ त्यामध्ये झोन कंपनीची बॅटरी क्र १८००४२५६६८ किं अंदाजे २००० रू व हबॅटरी क्र १८००४२५४८४८ अंमरान कंपनीची जुनी वापरती कि अंदाजे ३००० रू असा बॅट-या ट्कामध्ये होत्या दि ०२.०६.२४ रोजी फिर्यादी ट्काजवळ आले असता त्यांना बॅट-या दिसुन आल्या नाही कोणीतरी अज्ञात चोराने त्या चोरून नेल्या अशा फिर्यादी चे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल. |
| २ | पो ठाणे सिटि कोतवाली अप क्र.२१०/२४ कलम ३८० भादवी | खापर्डे बगिचा अमराती | दि ०२.०६.२०२४ चे ०७.७५ वा<br><br>दाखल ता वेल दि.०२.०६.२०२४ चे १५.१९ वा | राजेश्वर मोहन हसंराज वय ३२ वर्ष व्यवसाय सॉफ्टवेअर इंजिनियनररा खापर्डे बगिचा अमरावती | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे की,नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पुन्यामध्ये सॉफ्टवेअर इंजिनियर आहेत त्यांचे वडिलोपार्जित खापर्डे बगिचा येथे घर आहे .फिर्यादी यांचे मुलाचा रियांश याचा अन्न प्राशन कार्यक्रम असल्याने ते दि ०१.०६.२०२४ रोजी दुपरी ०३.३० वा खापर्डे बगिचा येथे आले.नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची आई ह्या सकाळी ०७.४५ वा बाहेर भाजी घेणे करीता गेल्या तेव्हा त्यांच्या आईसोबत लेजिज ऑरेंज कलरची पर्स त्यात नगदी ५०० रु च्या २५ नोटा १२,५००/-रु व आईचा जुना वापरता रिअलमी ५ प्रो ब्लु ६४ जिबी जुना वापरता मोबाईल ज्याला आयएमआआय नंबर. ८६०३८७०४५५९३१९१ कि अं ५००० रु असा सोबत होते भाजीपाला घेवुन आई घरी परत आली.घरातील दरवाज्याजवळील फ्रिजवर पर्स व मोबाईल ठेवुन घराचे मेन डोअर ओपन ठेवुन आंघोळीसाठी बाथरुम मध्ये गेल्या व तेथुन काही वेळाने परत आल्या तेव्हा त्यांनी ठेवलेल्या ठिकाणी मोबाईल व पर्स दिसुन आली नाही.तेव्हा फिचे आईने फिर्यादीस मोबाईल व पर्स व त्यातील पैसे चोरीस गेल्याचे सांगितले.वरुन फिर्यादी यांनी पो स्टे ला येवुन तक्रार दिली वरुन सदरचा गुन्हा दाखल. |

## इतर

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| १ | फ्रेजरपुरा अपक्र ५०६ /२४ कलम १४२ मपोका | एकता नगर बिच्छुटकडी अमरावती | दि ०२.०६.२४चे ०१.३० वा<br><br>दि ०२.०६.२४चे ०२.५५वा | सरतर्फे नापोका हरीश बुदंले बंन ९२४ पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | सोन्या उर्फ प्रफुल्ल अजय वानखडे वय २१ वर्षे रा एकता नगर बिच्छुटेकडी अमरावती | हकीकत अशाप्राकरे आहे की नमुद घटानातावेळी फियाी हे पोस्टाफ सह पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असता गुप्त बातमीदारकडुन माहिती मिळाली की तडीपार इसम सोन्या वानखडे हा आपले राहते घरसमोर फिरत आहे सदर इसम हा मा पोलीस उपायुक्त सा परिमंडळ 01 यांचे आदेश क्र पोउपआ परि /01 /तडीपार /1543 /2022 दि 30.08.2022 अन्वये अमरावती शहर व ग्रामीणजिल्हातुन दोन वर्षाकरीता हद्दापार करण्यात आलेला आहे हि बाब लक्षात येताच खात्रीलायक बातमीवरून 01.35 वा दोन पंचाना सोबत घेवुन मिळाल्या वरून तेथे जावुन पाहणी केली असता सरकारी इलेक्टीक स्टीट लाईटच्या उजेजाखाली एक इसम अंगात काळ्या रंगाचा शर्ट घातलेला उभा दिसला त्यास पंचासमक्ष ताब्यात घेवुन इसमास नाव गाव विचारले व अमरावती शहरात येण्याचे कारण विचारले असता त्याने वाजवी कारण संागीतले नाही उडवाउडवीचे उत्तरे दिली त्याने आदेशाचे उल्लघंन केल्याने कलम 142 मपोका प्रमाणे त्याचे विरूध्द गुन्हा दाखल होत असल्याने गुन्हा दाखल. |
| 2 | नागपुरी गेट अप नं 208 / 24 कलम 294,323,504,506,34 भादवी | मुजफरपुरा अमरावती | दि.02.06.2024 चे 11.30 वा<br><br>दि.02.06.24 चे20.04 वा | अफरोज खान रहेमान खान वय 28 वर्ष रा मुजफरपुरा जुबेर किराणा जवळ अमरावती | 1.अब्दुल अहेसान अब्दुल कलाम<br><br>2.अब्दुल ईमरान अब्दुल कलाम दोन्ही रा मुजफरपुरा अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि,आरोपी क 1 हा फिर्यादीला कामाचे पैसे मागत असता फिर्यादीने म्हटले कि,तुम्हे मजुरीक पैसे कल मिल जायेंगे आज रविवार है काम वाले मालक ने मुझे पैसे दिये नही असे म्हटले वरून आरोपी क 1 ने फिर्यादीस शिविगाळ केली फिर्यादीने आरोपी क 1 ला समजविण्याचा प्रयत्न केला असता आरोपी क 1 ने फिर्यादीच्या पाठीवर लाथाबुक्यांनी मारहान केली आरोपी क 1 व 2 यांनी फिर्यादीस अश्लिल शिविगाळ करुन मारण्याची धमकी दिली अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून व मेडीकल सर्टिवरून सदरचा गुन्हा दाखल |

## प्रोव्हीशन :-

| अ.क्र. | पो.ठाणे गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| १ | फ्रेजरपुरा अप क्र. 508/2024 कलम 65(ई)मदाका. | वडाळी तलावा परिसारत पिर बाबा दर्गाजवळ अमरावती | 02/06/2024 चे 12.00 वा | 02/06/2014.13वा. | सरतर्फे पोहेका रज्जाक शेकुवाले ब.न.157 पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | नितेश खेमसिंग सुनेरे वय 25 वर्ष रा परिहार पुरा वडाळी अमरावती वाडा फ्रेजरपुरा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठीकाणी फिर्यादी हे पो.स्टाफ सह तसेच पो.स्टाफ सह पोस्टे हददीत पेट्रोलींग करीत असताना गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीवरुन नमुद घटनास्थळी जावुन प्रो.रेड केली असता नमुद आरोपी ताब्यातुन पंचासमक्ष जप्ती पंचनामा प्रमाने बाँबी संत्रा पावट्या 10 नग 180एम एल च्या कि.अ. 700/-रु चा मुददेमाल मिळुन आल्याने फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल. |
| २ | फ्रेजरपुरा अप क्र. 509/2024 कलम 65(ई) मदाका. | कुंभारवाडा फ्रेजरपुरा | 02/06/2024 चे 12.00 वा | 02/06/2014.50वा. | सरतर्फे पोहेका उमेश नेताम बंन 1058 पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | एक महीला | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठीकाणी फिर्यादी हे पो.स्टाफ सह तसेच पो.स्टाफ सह पोस्टे हददीत पेट्रोलींग करीत असताना गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहीतीवरुन नमुद घटनास्थळी जावुन प्रो.रेड केली असता नमुद आरोपी ताब्यातुन पंचासमक्ष जप्ती पंचनामा प्रमाने बाँबी संत्रा पावट्या 15 नग 180एम एल च्या कि.अ. 1050/-रु चा मुददेमाल मिळुन आल्याने फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ३ | पो स्टे फ्रेजरपुरा अप क्र ५१०/२०२४ कलम ६५ ई मदाका | आरोपीचे राहतें घरासमोर गवळीपुरा फ्रेजरपुरा नगीना मशीदी मागे अमरावती | दि ०२/०६/२०२४ चे १७७४५ वा. | ०२/०६/२०२४ चे २०/५१ वा. | पोहेकॉ योगेश श्रीवास वय ५४ ब नं १०१५ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | बाबुलाल हसन रायलीवाले वय ५५ वर्ष रा कुंभारवाडा नगीना मशीदीमागे फ्रेजरपुरा अमरावती | ळकिकत अशा प्रकारे आहे कि यातील र्फियादी हे पो द्यस्टापफ सह पो स्टे हददीत पेद्रोलींग करीत असतांना मिळालेल्या गुप्त माहीतीचे आधारे नमुद आरोपीवर पंचांसमक्ष पो स्टापचे मदतीने प्रोरेड केली असता नमुद आरोपीचे कब्जात विनपा परवाना अवैधरित्या १० लीटर गावठी हातभटटी ची दारू प्रतिलीटर २०० रू प्रमाणे किं अं २०००/—रु प्रोव्ही मुददेमाल पंचांसमक्ष जप्ती पंचनाम्या प्रमाणे जप्त केला नमुद आरोपीचे हे कृत्य कलम ६५ ई मदाका प्रमाणे होत असल्याने आरोपीचे विरुध्द सदरचा गुन्ळा फि चे लीखी रिपोट वरुन गुन्हा दाखल |
| ४ | बडनेरा अप.क्र.३७९/२०२४ कलम ६५(ई) | चैन रेस्टॉरेन्ट अँन्ड बार चे बाजुला शशी नगर बडनेरा रोड अमरावती | दि.०२.०६.२०२४ चे ०७.३० वा. | दि.०२.०६.२०२४ चे १२.०७ वा. | सरतर्फे सपोनि संदीप हिवाळे पो स्टे बडनेरा | गजानन दिवाकर मोरे वय- ४३ वर्ष रा. चावडी चौक जुनी वस्ती बडनेरा | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीने पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर प्रो.रेड केला असता त्याच्या ताब्यातुन अवैधरित्या विनापरवाना १)०२ नग Budweiser Magnum Beer प्रत्येकी ६५० एम.एल काचेची सिलबंद बॉटल कि.अं. ४८०/- रु. २) ०२ नग Kingfisjer Storm Beer प्रत्येकी ६५०एम.एल. काचेची सिलबंद बॉटल कि.अं.३९०/- ३) ०२ नग Simba Beer प्रत्येकी ६५०एम.एल. काचेची सिलबंद बॉटल कि.अं.३८०/- ४) ०२ नग Carlsberg Elephant Beer प्रत्येकी ६५०एम.एल. काचेची सिलबंद बॉटल कि.अं४८०/- ५) ०२ नग Tuborg Strong Beer प्रत्येकी ६५०एम.एल. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मदाका | | | | | | काचेची सिलबंद बॉटल कि.अं३८०/- ६) ०२ नग Kingfisher Strong Beer प्रत्येकी ६५०एम.एल. काचेची सिलबंद बॉटल कि.अं.३८०/-७) ०२ नग Imperial Blue Whiskyप्रत्येकी १८०एम.एल. काचेची सिलबंद बॉटल कि.अं.३२०/- ८) ०२ नग Officers Choice Blue Whiskyप्रत्येकी १८०एम.एल. काचेची सिलबंद बॉटल कि.अं.३००/-९) ०३ नग Royal Stage Whisky प्रत्येकी १८०एम.एल. काचेची सिलबंद बॉटल कि.अं.५४०/- १०) ०२ नग Royal Challenge Whisky प्रत्येकी १८०एम.एल. काचेची सिलबंद बॉटल कि.अं.३०/- ११) ०२ नग Mcdowells No. १ Whiskyप्रत्येकी १८०एम.एल. काचेची सिलबंद बॉटल कि.अं.३००/- १२) ०२ नग Mcdowells No. १ Rum प्रत्येकी १८०एम.एल. काचेची सिलबंद बॉटल कि.अं.२९०/- १३) ०२ नग Old Monk Rum प्रत्येकी १८०एम.एल. काचेची सिलबंद बॉटल कि.अं.२९०/-असा एकुण ४,८९०/- रु.चा प्रोव्हीशन माल व नगदी १८०/- रु. असा एकुण ५०७०/- रु चा मुद्देमाल मिळुन आला. वरून सदर आरोपीवर सदरचा गुन्हा दाखल. |
| ५ | पोस्टे गाडगेनगर अपक्र ५१३/२०२४ कलम ६८ म दा का | बीग डॅडी हॉटैल रींग रोड अमरावती | दि ०१/०६/२०२४ चे २३/३० वा | दि २/६/२०२४ चे २/१४ वा | पोउपनी गजानन लोकडे पोटे गाडगेनगर अम | आदित्य मोहनराव साखरे वय २७ रा रूरल कॉलनी शीवाजी नगर अमरावती नाही | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी दि २/६/२०२४ चे ९/० वा पावेतो नाईट डयुट अतांना पोस्टाफदरम्यान २३/३० वा चेकींग दरम्यान हॉटेल बीग डॅडी कठोरा रींग रोड या ठीकानी हॉटेल मालक ग्राहकासह दारू पीण्याकरीता जागा व सुविधा उपलब्ध करून देताना मीळुन आला ग्राहम आम्हास पाहुन तेथुन नीघुन गेले ग्राहकाचे टेबलवर blenders pride चे बॉटल मध्य ३७५ एम एल इंग्लीश दारू पेकी १८० एम एल सील्लक राहीलेले दारू तसेच Roya challenge चे बॉटल मध्ये १८० एम एल इंग्लीश दारू पैकी ९० एम एल सील्लक दारू मीळुन आली वरील दोन पंचाना लगेच बोलावुन दारू बाबत माहीती देुन पंचासमक्ष वरील नमुद वर्णनाची इग्लीश दारू एकुन की ४५० रू ची घटनास्थळ जप्ती पंचनामा प्रमाणे दारू पीण्यासाठी दीले दोन काचेचे ग्लास की अं ५० रू असा एकुन ५०० रू चा माल पंचाासमक्ष जप्त करण्यात आला. वरून सदर आरोपीवर सदरचा गुन्हा दाखल. |
| ६ | पोस्टे गाडगेनगर अपक्र ५१४/२०२४ कलम ६५ ई म दा का | महात्मा फुले नगर नवारी अमरावती | दि २/६/२०२४ चे सकाळी ०९.०० वा | दि २/६/२०२४ चे १२/४९ वा | पोहेकॉ भारत श्रावण वानखडे बनं १०५ पोस्टे गाडगेनगर अमरावती | बाळु उत्तमराव जुनघरे वय ६४ रा महात्मा फुले नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी गुप्त बातमी दाराकडुन मीळालेल्या गुप्त बातमी वरून नमुद आरोपी याचे घराजवळ पंचासमक्ष प्रो रेड केला असता नमुद आरोपीचे ताब्यातुन १ देशी दारू बॉबी संत्रा कंपनीचे ४० नग ९० एम एल मापाच्या प्लॉटीक शीशी प्रत्येकी की अं ५० रू एकुन २००० रू चा माल २ mc dowels no -१ चे ६ नग काचेचया ९० एम एल शीशी प्रत्येकी की अं १०० रू एकुन की ६०० रू ३ Imperial blue चे ५ नग काचेच्या ९० एम एल शीशी प्रत्येकी की अं १०० रू एकुन की ५०० रू ४ Officers choice bue चे ५ नग काचेच्या ९० एम एल शीशी प्रत्येकी की अं १०० रू असा एकुन की ५०० रू देशी व इग्रजी दारूचा मुददेमाल एकुन की ३६०० रू चा माल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. वरून सदर आरोपीवर सदरचा गुन्हा दाखल. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | □□□□□□ . □□ क्र 93/24 □□□ 65(ई) म.दा.का | लेंडी नाल्या च्या लोंखडी पुलाजवळ भातकुली | □□□□ □□.□□ दि.02.06.24 □□ 20.10 वा ते 20.30 □□ | □□□□ □□ – दि.02.06.24 □□ 21.05 □□ | सरतर्फे नापोकाँ प्रशांत यादव ब नं 396 पोस्टे भातकुली | नकुल सुर्यभान दंदे वय 62 वर्ष रा. इंदिरा नगर भातकुली | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील फिर्यादी यांना गुप्तबातमीदाराकडुन खात्री लायक बातमी मिळाली की एक ईसम लेंडी नाल्याच्या लोंखडी पुलाजवळ अवैद्य रित्या दारु विक्री करत आहे वरुन आम्ही पोस्टे स्टाँफ व पंचा समक्ष प्रोव्ही रेड केली असता आरोपीचे ताब्यातुन 23 नग बाँबी संत्रा कंपनीच्या देशी दारु पावट्या 180 एम.एल.कि अं 1840/-रु चा प्रोव्हीमाल मिळुन आल्याणे सदर गुन्हा दाखल. |

## अकस्मात मृत्यु-

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| १ | बडनेरा मर्ग क्र. ३१/२०२४ कलम १७४ जाफौ | शिवाजी चौक नवी वस्ती बडनेरा | दिलीपराव मधुकराव काळे वय- ५४ वर्ष रा. जनता काँलनी गोपाल नगर अमरावती | अल्पेश दिलीपराव काळे वय- २३ वर्ष रा. जनता काँलनी गोपाल नगर अमरावती | समजुन आले नाही | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फि.हे मयताचा मुलगा असुन मयतास दम्याचा (अस्थमा) चा आजार होता.व त्यास दारुचे व्यसन होते. दि.०१.०६.२०२४ चे १२.०० वा. मयत हे गार्ड ड्युटी चे कामावर जातो असे म्हणुन गेले परंतु रात्रभर घरी परत आले नाही. नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी फि.चे आईच्या मोबाईल वर फोन आला व त्यावर एक इसम म्हणाला की, एक माणुस शिवाजी चौक नवी वस्ती बडनेरा येथे मृत अवस्थेत आहे. त्याचे शरीराचे खिशाच्या डायरी मध्ये तुमचा मोबाईल नंबर असल्याने माहिती दिली. अशा माहिती वरुन फि.त्यांचे आईसह नमुद ठिकाणी गेले असता त्यांचे वडील चित्त अवस्थेत पडलेले दिसले. फि.ने हात लावुन पाहिले असता ते मरण पावल्याचे दिसले. त्यानंतर पोस्टे बडनेरा येथील पोलीसांनी त्यांना गाडीत टाकुन ईर्विन येथे नेले अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल |

